# परिपत्रक

विविध वित्तीय शिखर संस्थांमार्फत वेळोवेळी जाहीर करण्यात येणाऱ्या सूचना, परिपत्रके, मार्गदर्शक नियमावली, इ. द्वारे विद्यापीठातील अधिविभागांस/शिक्षकांना/विद्यार्थ्यांना आर्थिक निधीसह विविध योजना/संशोधन प्रकल्प/फेलोशिप, इ. बाबी मंजूर केल्या जातात. सदर बाबीच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय शिखर संस्थांमार्फत विहीत वेळेत, विहीत पध्दतीने अर्ज मागविण्यात येतात व त्याकरीता विद्यापीठातील विविध अधिविभाग/शिक्षक/पदव्युत्तर-संशोधक विद्यार्थी हे अर्ज सादर करतात.

तथापी, सदर बाबीसंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठातील विविध अधिविभाग/शिक्षक/ पदव्युत्तर-संशोधक विद्यार्थी यांचेमार्फत सादर करण्यात येणारे अर्ज हे अंतिम दिवशी व अंतिम क्षणाला आवश्यक त्या विविध प्रशासकीय मंजूरी व Endorsement Certificate/Forwarding Letter, etc. प्राप्त होणेकरीता कार्यालयात जमा केले जातात. त्यावर तात्काळ मा. वरिष्ठ अधिकारी यांची मान्यता घेऊन, मा. कुलसचिव यांची स्वाक्षरी घ्यावी असे कार्यालयास कळवितात. त्यामुळे संबंधितांनी सादर केलेल्या प्रस्तावावर तातडीने मान्यता घेणे अडचणीचे होते. तसेच, अनेकदा वरिष्ठ अधिकारी हे विविध बैठकांमध्ये/कामकाजात व्यस्त असतांना अशा प्रकारचे प्रस्ताव स्वाक्षरीसाठी तातडीने सादर केल्याने, सदर बैठकींमध्ये/कामकाजामध्ये अडथळा निर्माण होतो.

यास्तव आदेशांवरुन आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने सादर करण्यात येणारे विविध परिपूर्ण प्रस्ताव (संबंधित वित्तीय संस्थेच्या मार्गदर्शक नियमावली/पात्रतेनुसार) अंतिम मुदतीच्या किमान दोन दिवस आधी महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभागात आवश्यक त्या कार्यवाहीकरीता सादर करण्यात यावेत.

**कुलसचिव,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा. क्रं. म.ववि.वि.विभाग/** ३१८
**दि.** 0 4 AUG 2023

**प्रति,**
**अधिविभागप्रमुख/समन्वयक/संचालक/शिक्षक/विद्यार्थी,**
**सर्व अधिविभाग,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**(सदरचे परिपत्रक विद्यापीठातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.)**